# नवी मुंबई महानगरपालिका
## शिक्षण विभाग

### CBSE शाळांतील विद्यार्थी प्रवेश प्रक्रिया सन 2024-25

मा. महासभेच्या मान्यतेने नवी मुंबई महानगरपालिका मार्फत नमुंमपा शाळा क्र. 93 नेरूळ, सेक्टर-50, नमुंमपा शाळा क्र. 94, कोपरखैरणे, सेक्टर-11 व नमुंमपा शाळा क्र. 98 सारसोळे या ठिकाणी सीबीएसई बोर्डाशी संलग्न शाळा सुरु करण्यात आल्या आहेत. या शाळांमध्ये सन 2024-25 साठी नर्सरी ते इयत्ता 7वी च्या वर्गातील रिक्त जागांवर प्रवेश प्रक्रिया राबविणेत येत आहे. प्रवेश पुर्णत: नि:शुल्क असल्याने या सुविधेचा लाभ सार्वाधिक पालकांनी घ्यावा, असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेच्यावतीने करण्यात येत आहे. प्रवेशाबाबतचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| वयोगट | : | प्रवेशाचा वर्ग | 31 डिसेंबर 2024 रोजीचे किमान वय | वयोमर्यादा |
|---|---|---|---|---|
| | | नर्सरी | 3 वर्षे | 1 जुलै 2020 – 31 डिसेंबर 2021 |
| | | ज्युनिअर के.जी. | 4 वर्षे | 1 जुलै 2019 – 31 डिसेंबर 2020 |
| | | सिनिअर के.जी. | 5 वर्षे | 1 जुलै 2018 – 31 डिसेंबर 2019 |
| | | 1ली | 6 वर्षे | 1 जुलै 2017 – 31 डिसेंबर 2018 |
| | | 2री | 7 वर्षे | 1 जुलै 2016 – 31 डिसेंबर 2017 |
| | | 3री | 8 वर्षे | 1 जुलै 2015 – 31 डिसेंबर 2016 |
| | | 4थी | 9 वर्षे | 1 जुलै 2014 – 31 डिसेंबर 2015 |
| | | 5वी | 10 वर्षे | 1 जुलै 2013 – 31 डिसेंबर 2014 |
| | | 6वी | 11 वर्षे | 1 जुलै 2012 – 31 डिसेंबर 2013 |
| | | 7वी | 12 वर्षे | 1 जुलै 2011 – 31 डिसेंबर 2012 |

| प्रवेश संख्या | : | प्रवेशाचा वर्ग | नमुंमपा शाळा क्र. 93 नेरूळ | नमुंमपा शाळा क्र. 94, कोपरखैरणे | नमुंमपा शाळा क्र. 98 सारसोळे |
|---|---|---|---|---|---|
| | | नर्सरी | 120 | 80 | 40 |
| | | ज्युनिअर के.जी. | 0 | 0 | 10 |
| | | सिनिअर के.जी. | 0 | 0 | 10 |
| | | 1ली | 8 | 0 | 10 |
| | | 2री | 0 | 10 | 17 |
| | | 3री | 22 | 16 | - |
| | | 4थी | 9 | 16 | - |
| | | 5वी | 5 | 3 | - |
| | | 6वी | 11 | 8 | - |
| | | 7वी | 1 | 14 | - |

| | | |
|---|---|---|
| आवश्यक कागदपत्रे | : | पाल्याचा जन्मदाखला, जातीचा दाखला, पासपोर्ट साईझ फोटो, आधारकार्ड व वडिलांचा रहिवासी पुरावा. |

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| प्रवेश फॉर्म भरण्याची कार्यपध्दती व अंतिम दिनांक | : | प्रवेश अर्ज ऑनलाईन पध्दतीने www.cbse.nmmcedu.in या वेबसाईटवर दिनांक 04/06/2024 पर्यंत भरावयाचा आहे. प्रवेश अर्ज भरणेबाबतची माहिती वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. |
| सुविधा | : | सुसज्य शाळा इमारती, प्रशिक्षित शिक्षक, नि:शुल्क शिक्षण व शैक्षणिक साहित्य. |

**प्रवेशासाठी आवश्यक अटी :**

1) प्रवेशासाठी शाळेपासून 1 कि.मी. चे आत अंतरावर राहणा-या विदयार्थ्यांना प्राधान्य देणेत येईल.

2) 31 डिसेंबर 2024 रोजी उक्त नमूद केल्याप्रमाणे वय वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे.

3) प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त अर्ज आल्यास नियुक्तीसाठी लॉटरी पध्दत अवलंबविण्यात येईल.

4) शिक्षण नि:शुल्क असुन बस सेवा उपलब्ध असणार नाही.

5) प्रवेशाबाबतची माहिती पालकांना त्यांनी रजीस्टर केलेल्या मोबाईल क्रमांकावर मेसेजद्वारे प्राप्त होईल.

6) पालकांनी ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रिंट व अपलोड केलेली कागदपत्रांची छायांकित सत्यप्रती तसेच मूळ कागदपत्रे पडताळणीच्या वेळी शाळेत सादर करणे बंधनकारक आहे.

7) ऑनलाईन व्यतिरिक्त इतर पध्दतीने प्राप्त झालेल्या अर्जांचा प्रवेश प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही.

8) शाळा प्रवेशाचे सर्व अधिकार मा.आयुक्त, नमुंमपा यांचे स्वाधीन राहतील.

(योगेश कडूसकर)
उप आयुक्त (शिक्षण)
नवी मुंबई महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner